दैनिक **वादळ वार्ता**

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

VADAL VARTA


vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार ८ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २०५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये







# लोकसभा निवडणुकीसाठी जरांगेंची नवी मोहीम. गावागावात उमेदवार

## यंत्रणेची डोकेदुखी वाढण्याची शक्यता

**दैनिक वादळ वार्ता**

मराठा आरक्षणाच्या लढाईसाठी मनोज जरांगे आणि त्यांच्या समर्थकांनी आता सरकारला कोंडीत पकडण्यासाठी नवी योजना आखलीय. ती म्हणजे प्रत्येक गावातून लोकसभा निवडणुकीसाठी किमान ५ ते ७ उमेदवारी अर्ज भरण्याची. महाराष्ट्रातल्या अनेक गावा-गावात उमेदवारी अर्ज भरण्याची तयारी सुरु आहे. असं करण्यामागे आरक्षणाच्या मुद्याची गंभीरता सरकारच्या लक्षात आणून देणं. ईव्हीएमऐवजी मतपत्रिकेवर मतदानासाठी जनजागृती करणं आणि आरक्षणाबद्दल रोष व्यक्त करणं, असे हेतू यामागे असल्याचं बोललं जातंय. ज्यामुळे लोकसभा निवडणुकीत सरकारबरोबरच निवडणूक आयोगाचीही डोकेदुखी



वाढण्याची चिन्हं आहेत गावागावात सुरु असलेल्या या मोहिमेनं यंत्रणाही अलर्ट झालीय. धाराशीवच्या जिल्हाधिकारी सचिन ओम्बासेंनी याबाबत निवडणूक आयोगाला पत्र लिहून मार्गदर्शनही मागवलंय. त्या पत्रात काय आहे. त्याआधी तसं खरोखर घडल्यास काय होणार त्याची पार्श्वभूमी समजून घेऊयात. हे ईव्हीएम मशीन आहे. सध्या एका मशीनमध्ये १६ उमेदवारांची नावं बसतात. समजा एखाद्या मतदारसंघात 384 उमेदवार जरी उभे राहिले, तरी त्यासाठी 24 ईव्हीएम मशीन एका केंद्रावर आणावे लागतील. तसं जरी घडलं तरी सध्या 24 मशीन्स आणून ईव्हीएमवर मतदान करण्याची यंत्रणा आहे. मात्र मराठा आंदोलक प्रत्येक गावातून किमान 4 ते 5 उमेदवार उभे करण्याच्या तयारीत आहेत.

प्रत्येक तालुक्यात सरासरी 250 गावं असतात. समजा एका गावातून एक जरी उमेदवार उभा राहिला. तर लोकसभेत 6 तालुके गुणिले 250 म्हणजे 1500 उमेदवारांचे अर्ज येतील आणि जर उमेदवार 384 हून अधिक असले, तर मात्र निवडणूक ही ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर घ्यावी लागेल. हीच शक्यता गृहीत धरुन त्याचा व्यवस्थेवर काय ताण येईल, याबाबत धाराशीवच्या जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहिलंय.

मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन गावागावातून आंदोलक अनेक अर्ज दाखल करण्याची शक्यता नाकारता येत नाही. असं घडल्या ईव्हीएमच्या क्षमतेहून जास्त अर्ज येतील, त्यामुळे ईव्हीएमवर निवडणूक घेणे अडचणीचे ठरणार आहे. पर्याय म्हणून मतपत्रिका किंवा मतपेट्यांचा वापर करायचा झाल्यास अपुरं मनुष्यबळ, मतपेट्यांची उपलब्धता अशा समस्या येवू शकतात. शिवाय उमेदवारांची संख्या वाढल्यास मतपेट्याही तेवढ्याच मोठ्या आकाराच्या लागणार. त्याचप्रमाणे निवडणुका झाल्या तर मतपेट्या नेण्यासाठीची वाहनं, सुरक्षा, मतपेट्या ठेवण्यासाठीची जागा अपुरी पडणार आहे. उपरोक्त परिस्थितीनुसार येणाऱ्या अडचणी आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने मार्गदर्शन करावे ही विनंती.आता कायद्यानुसार निवडणूक आयोग कोणत्याही पात्र व्यक्तीला उमेदवारी अर्ज भरण्यापासून रोखू शकत नाही. भारतीय संविधानाच्या कलम 84 (ब) नुसार 25 वर्षाच्या कोणत्याही व्यक्तीला लोकसभेची निवडणूक लढवण्याचा अधिकार आहे. त्यामुळे मराठा आंदोलक गावागावात उमेदवार अर्जांची तयारी करतायत.

## देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारामुळे विद्यार्थ्यांच्या कल्याणकारी योजनांना संजीवनी



राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याला विकासाची गती देण्यासाठी अनेक उल्लेखनीय कामे केली आहेत. फडणवीस यांच्या पुढाकाराने मागील सरकारमधील मंत्रिमंडळाने महाराष्ट्रात आरक्षणासाठी दीर्घकाळ आंदोलन करणाऱ्या तरुणांचे आंदोलन थांबवण्यासाठी अनेक फायदेशीर योजना सुरू केल्या आहेत.

देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने सन 2016 मध्ये मागील सरकारच्या मंत्रिमंडळाने आर्थिक मागासप्रवर्गातील (ईबीसी) विद्यार्थ्यांसाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेचे काम सुरू केले. त्यामुळे महाराष्ट्रातून येणाऱ्या ईबीसी विद्यार्थ्यांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्नाचे निकष एक लाखरुपयांवरून अडीच लाख रुपये करण्यात आले आहेत.

इतरही अनेक उपक्रम हाती घेण्यात आले. ज्यामध्ये या प्रवर्गातून येणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी अनेक सवलती आणि सवलती देण्यात आल्या होत्या. या योजनेच्या माध्यमातून असहाय विद्यार्थ्याची आर्थिक स्थिती चांगली नसते आणि त्यांच्या कौटुंबिक अडचणींमुळे अभ्यासात अनेक अडथळे येतात. ज्यांचे वार्षिक उत्पन्न 6 लाख रुपयांपेक्षा कमी आहे. राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत शासनाने विद्यार्थ्यांकडून शिक्षणासाठी वर्षानुवर्षे खर्च होणाऱ्या शुल्काच्या 50 टक्के रक्कम भरण्याची तरतूद केली. याचे श्रेयही मराठा समाजाच्या हक्कांसाठी दीर्घकाळ लढा देणारे लोकसेवक फडणवीस यांनाच जाते. काँग्रेस सरकारने केवळ मराठ्यांच्या सन्मानाशी खेळ केला आहे, तर फडणवीस यांनी छत्रपती शिवरायांना प्रेरणास्थान मानून त्यांचे त्याग आणि चिकाटी अंगीकारून महाराष्ट्रातील जनतेच्या कल्याणासाठी आपले जीवन समर्पित केलं आहे

# पुन्हा अशी दमदाटी केली तर मला शरद पवार म्हणतात

**वादळवार्ता/लोनावळा**

काही दिवसातच लोकसभेच्या निवडणुका जाहीर होणार आहेत. सर्व पक्षांनी निवडणुकांची सुरू केली आहे, राज्यात राष्ट्रवादी शिवसेनेत उभी फूट पडली असल्यामुळे निवडणुकीची चांगलीच चर्चा सुरू आहे. बारामती मतदार संघात सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशी लढत होणार असल्याचे बोलले जात आहे, यामुळे आता खासदार शरद पवार स्वतः मैदानात उतरल्याचे दिसत आहे. आज खासदार शरद पवार यांची लोणावळ्यात सभा झाली. या सभेत पवार यांनी दमदाटीवरुन अजित पवार गटाचे आमदार सुनिल शेळके यांना इशारा दिला. आज शरद पवार यांनी आयोजित केलेल्या बैठकीला नेत्यांनी जाऊ नये म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार सुनिल शेळके राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षातील कार्यकर्त्यांना दमदाटी करत असल्याचा आरोप केला आहे. यावरुन आज खासदार शरद पवार यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाचे आमदार सुनिल शेळके यांना इशारा दिला. अमित शाहंच्या टीकेला शरद पवारांचा 'पवारस्टाईल' पलटवार; उपस्थितांच्या टाळ्या लोणावळ्यातील सभेत बोलताना शरद पवार म्हणाले, भाजपकडून सत्तेचा गैरवापर सुरू आहे. शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ आणली हीच मोदींची गॅरेंटी आहे, अशी टीकाही पवारांनी केली! मला काहींनी सांगितले की आजच्या मिटींगला येऊ नये म्हणून काहींनी आम्हाला दमदाटी केली. टीका केली म्हणूनही फोन करुन दमदाटी केली. लोकशाहीमध्ये



जाहीर बोलायचं नाही का? इथल्या आमदारांना मला सांगायच आहे तुम्ही आमदार कुणामुळे झाला, तुमच्या कोण आलं होतं, त्यावेळी पक्षाचे अध्यक्ष कोण होतं, त्यावेळी पक्षाच्या फॉर्मवर सही माझी होती. तुमच्या आमदाराकीवेळी याच कार्यकर्त्यांनी काम केलं, तुम्हाला निवडून आणण्यासाठी राबले, घाम गाळला आज त्याच कार्यकर्त्यांना तुम्ही दमदाटी करता. माझी त्यांना विनंती आहे, एकदा त्यांनी दमदाटी केली बास पुन्हा असं काही केलं तर मला शरद पवार म्हणतात', मी या रस्त्याने कधी जात नाही. पण या रस्त्याने जाण्याची स्थिती कुणी निर्माण केली तर... असा इशारा शरद पवार यांनी आमदार सुनिल शेळके यांना दिला

# बीड तालुक्यात सौंदाना गावाला पहिले पाण्याचे टँकर सुरू

**वादळवार्ता/बीड**

सौंदाना ता.जि.बीड येथे तालुक्यातील पहिले पाण्याचे टँकर सुरू झाले आहे श्री गायके राजू व ग्रामस्थांनी ड्रायव्हरचा शाल, श्रीफळ आणि हार घालून व तोफा वाजून सत्कार केला यावेळी सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.

बीड तालुक्यातील सौंदाना गावाला जानेवारी महिन्यातच दुष्काळाच्या झळाची चाहूल लागली होती म्हणून गावकऱ्यांनी सरपंच व ग्रामसेवक यांना जानेवारी महिन्यातच निवेदन दिले होते आणि त्याची दखल न घेतल्यामुळे परत नऊ जानेवारी रोजी निवेदन देऊन विशेष महिला ग्रामसभा घेण्यात यावी अशी मागणी महिला ग्रामस्थांनी केली होती तरीपण आज पर्यंत या पाणीटंचाईची दखल न घेतल्यामुळे शेवटी ग्रामस्थांना आंदोलन करण्याची वेळ आली. म्हणून चार मार्च रोजी श्री छत्रपती शिवाजी चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय व तसेच पंचायत समिती बीड ऑफिस यांच्या दालनात हंडा मोर्चा आंदोलन करण्यात आले व गट विकास अधिकारी श्री साळुंखे सर यांनी श्री गायके राजू व ग्रामस्थांना लेखी निवेदन देऊन आंदोलन स्थगित करण्याची विनंती केली आणि ग्रामस्थांनी लेखी निवेदन स्वीकारल्यानंतर आंदोलन मागे घेत तीन दिवसाचा अल्टिमेटम देण्यात आला होता, त्यानुसार श्री गायके राजू यांच्या सतत



पाठपुराव्यामुळे तिसऱ्या दिवशी बीड तालुक्यातील सौंदाना गावाला पहिले पाण्याचे टँकर सुरू झाले यावेळी आंदोलनात सहभागी झालेले ग्रामस्थ स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बीड श्री गायके राजू, सौंदाना सोसायटीचे चेअरमन श्री श्रीकृष्ण गायके, विशाल गायके, तेजस गायके, सतीश गायके, कल्पेश कथले, रवींद्र गायके, विपुल पाटील, किशोर गायके, अंगणवाडीच्या मदतनीस मंदा प्रल्हाद गायके, तारामती कथले, रेखा आकाश कथले, सुनिता कथले, यमुना गायके, कांताबाई काकडे, कालींदा गायके, आशा स्वयंसेविका पार्वती गायके, रुक्मीन तुळवे, शोभा ढवळे, तसेच आज टँकर गावात आल्यानंतर ग्रामस्थांची आनंद व्यक्त केला यावेळी विजय संतोष, गायके गणेशकडाजी गायक, दत्ता गायके, विश्वंभर हकाळे, सत्यवान हाकाळे, दिलीप गायके, बाळासाहेब गायके तसेच ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत पाटेगाव शाळेचा जिल्ह्यास्तरावर द्वितीय क्रमांक

**दै वादळ वार्ता पाटेगाव/चैताली औटे**

विश्वात्मा शिक्षण प्रसारक मंडळ छत्रपती संभाजीनगर संचलित कौशल्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय पाटेगाव शाळेचा मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत जिल्ह्यास्तरावर द्वितीय क्रमांक मिळवला.याबद्दल शाळेचे सर्वत्र कौतुकांचा वर्षाव होत असतानाच संस्थेचे अध्यक्ष आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त (महाराष्ट्र राज्य) श्री चंद्रकांतजी गायकवाड साहेब,श्री. शिवाजीराव कटारे संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती अंबड, श्री भगवान




जाधव सदस्य ग्रामपंचायत साष्ट पिंपळगांव, श्री प्रा. अंकुशराव औटे देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर, श्री रामेश्वर आप्पा हुरणे, श्री नंदू पाटील गायकवाड यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री निलेशजी गायकवाड सर व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना रजिस्टर, पेन देऊन त्यांचे कौतुककरून अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांचे संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रकांतजी गायकवाड साहेब यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. निलेशजी गायकवाड,शाळेचे सहशिक्षक श्री नंदकिशोर पातकळ, श्रीमती स्वप्नजा पाटील ,बालाजी नलभे,विजय सपकाळ,नारायण औटे,सोन्याबापु पालवे,भाऊसाहेब गायकवाड, प्रकाश कामडी,अमोल गायकवाड,अनिता तारख,आकेश दांडेकर,प्रवीण काळे, शितल थिटे, स्वप्निल गव्हाणे,अस्मिता भिसे, अक्षय शेळके, निखिल पापुलवार, सतिष पवार, महेश गायकवाड, विठ्ठल त्रिभुवन, इत्यादी उपस्थित होते.

# मानवलोक चा पुढाकार; शेतकऱ्यांना गाळ घेऊन जाण्याचे आवाहन

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई/परवेज पटेल**

शासनाच्या 'गाळमुक्त धरण शिवार ' योजने अंतर्गत मांजरा धरणातील गाळ काढण्याच्या मोहिमेचा शुभारंभ बुधवार दिनांक ६ मार्च २०२४ रोजी करण्यात आला. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा, मानवलोक चे कार्यवाह श्री. अनिकेत लोहिया सहकार्यवाह श्री. लालासाहेब आगळे, मांजरा प्रकल्पाचे शाखा अभियंता निकम, योजनेचे कर्मचारी विजय ठोंबरे, भाजपचे केज विधानसभा प्रमुख इंगळे मा, नगरसेवक प्रशांत आदनाक तसेच मांजरा प्रकल्प परिसरातील गावचे सरपंच, उपसरपंच, गावकरी, शेतकरी व मानवलोक चे कार्यकर्ते उपस्थित होते. या गाळ काढण्याच्या कामाच्या उद्घाटन प्रसंगी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा यांनी उपस्थितांना संबोधित केले. गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार ही योजना राज्य सरकारची महत्वकांक्षी योजना आहे. जिल्ह्यातील हलक्या जमिनी कसदार करण्याची व पडलेला पाण्याचा थेंब वाहून जाण्याऐवजी साठवण क्षमता वाढवून साठवण्याची ही एक संधी आहे. गाळ काढल्याने मांजरा धरणात पावसाळ्यात पडलेलं अधिक पाणी साठून त्याचा परिसरात फायदा होईल. असे सांगत त्यांनी मानवलोकचे संस्थापक डॉ. द्वारकादास लोहिया उर्फ बाबूजींच्या कार्याचा थोडक्यात परिचय करून दिला. आणि ते स्वतः मानवलोक चे कार्यकर्ते असताना केलेल्या कामाची आठवण त्यांनी आवर्जून यावेळी सांगितली. मानवलोक चे कार्यवाह श्री. अनिकेत




लोहिया यांनी गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना फायदा होईल. तलावातील गाळ काढून तो शेतकऱ्यांनी हलक्या जमिनीत टाकला. त्यांनतर त्या शेतकऱ्यांच उत्पादन वाढते . शेतात हा तलावात साठलेला गाळ टाकल्याने हा गाळ कसदार असल्याने पाच सहा वर्षे जमिनीत कसलेही खते टाकावे लागत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन खर्च कमी होते व उत्पन्न वाढते. त्याच बरोबर तलावात वर्षानुवर्षे गाळ साठल्याने एक घट्ट थर तयार होतो . व हा थर जमिनीच्या वर साठलेल्या पाण्यास भूपृष्ठाखाली मुरू देत नाही .हा गाळाचा थर निघाल्याने तलावातील सांधे मोकळे होऊन जमिनीतील रिचार्ज ही वाढतो पर्यायाने भूजलपातळी ही वाढते असे अनेक फायदे या गाळमुक्त धरण योजनेतून होऊ शकतील. असे सांगितले. मानवलोक स्थापनेपासूनच जलसंवर्धन आणि पाणलोट चळवळीत कार्यरत आहे. तसेच त्यांनी या बाबतीत मानवलोक करत असलेल्या कार्याचा थोडक्यात आढावा दिला. शाखा अभियंता श्री. निकम यांनी ही योजना मांजरा धरण परिसरात कशी राबवली जाईल आणि शासन त्यासंदर्भात कसे प्रयत्नशील आहे हे विशद करत शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात गाळ घेऊन या योजनेस प्रतिसाद देण्याचं आवाहन केले

# संपादकीय

## संकल्प महिलांना आर्थिक सक्षम करण्याचा

८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. आपल्या देशातही हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. आजच्या दिवशी वेगवेगळ्या क्षेत्रात स्वतःचा ठसा उमटवणाऱ्या महिलांचा गौरव केला जातो. सर्वच  क्षेत्रात महिला आज पुरुषांच्या बरोबरीने काम करीत आहेत. असे कोणतेही क्षेत्र नाही की ज्यात महिला पुरुषांच्या मागे आहेत. राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा, साहित्य,विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, उद्योग अशा सर्वच क्षेत्रात  महिला आपल्या कर्तृत्वाचा झेंडा रोवताना दिसत आहे. पूर्वी चूल आणि मूल ही जी महिलांची ओळख होती ती आता पुसली गेली आहे. मागील शतकात किंवा अगदी काही  दशकांपूर्वी म्हटले तरी चालेल महिला सक्षम नव्हत्या. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे महिला कायम दुर्लक्षित होत्या. सावित्रीबाई फुले यांच्यामुळे महिलांनी पहिल्यांदा घराचा उंबरठा ओलांडला. शिक्षणामुळे महिला स्वतःच्या पायावर उभ्या राहू लागल्या. शिक्षणामुळेच महिला सक्षम झाल्या असे असले तरी आजही देशातील महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत का  ? असा प्रश्न खेदाने विचारावा वाटतो. आज सर्वच क्षेत्रात महिला पुढे असल्या तरी त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम नाहीत असे म्हणावे लागेल. आज खाजगी तसेच शासकीय नोकऱ्यांमध्ये महिलांचे प्रमाण खूप आहे. अनेक महिला उच्चपदावर कार्यरत आहेत. असे असले तरी नोकरी करणाऱ्या महिलांचा त्यांच्या पगारावर कितपत अधिकार आहे हा संशोधनाचा विषय आहे. नोकरी करणाऱ्या महिलांना स्वतःचा पैसा स्वतः खर्च करण्याचा अधिकार नाही. आपल्या देशातील सर्वाधिक महिला या घरकामात गुंतलेल्या असतात. त्यांना आर्थिकदृष्ट्या पतीवर अवलंबून राहावे लागते. या महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम नाहीत. समाजात माणूस म्हणून जगायचे असेल तर आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे आवश्यक आहे. मध्ययुगात स्त्री ही एक असहाय्य व्यक्तिमत्त्व की जिला स्वतःचे अस्तित्वच नाही, अशी प्रतिमा समोर आली त्याला छेद देण्याचा प्रयत्न अजूनही चालू आहे.  पुरुषप्रधान संस्कृती आल्यापासून पुषांच्या लेखी महिलांचा दर्जा दुय्यम होत गेला. वेतनासंबंधी भेदभाव, स्वयंरोजगार, अर्थसाहाय्याचा अभाव, विनावेतन काम व बेरोजगारी, कुटीर उद्योगात मालकी हक्क नसणे अशा अनेक कारणांमुळे महिलांचे आर्थिक स्थान पुरुषांपेक्षा दुय्यम राहिले आहे. आज २१ व्या शतकातही तो दुय्यमच आहे. हा दुय्यम दर्जा जाऊन महिलांना पुरुषांच्या बरोबरीने मानाचे स्थान मिळवून द्यायचे असेल तर त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावेच लागेल.  महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करायचे असेल तर महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्यायला हव्यात. महिला मंडळे, स्वयंसहाय्यता बचत गट, विविध संस्था यांच्या माध्यमातून महिलांनी एकत्र येऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, यासाठी समाजानेही व्यासपीठ उपलब्ध करुन द्यायला हवे. पुरुषांनीही आपली पुरुषी मानसिकता सोडून महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न करायला हवेत. महिलांच्या पगारावर महिलांचाच अधिकार असायला हवा. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करुनच आपण देश सक्षम करु शकतो. देशाचा विकास  करायचा असेल तर महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करायलाच हवे.

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५




# महाशिवरात्री विशेष :- जाणून घ्या भगवान शिवाच्या हजारो नावांचा

'महाशिवरात्री' हा सण संपूर्ण भारतात श्रद्धेचा सण म्हणून साजरा केला जातो. या दिवशी भक्तगण शिवमंदिरांमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी करतात आणि धूप, दिवा, बेलची पाने, पंचामृत इत्यादी नैवेद्यांसह शिवलिंगांची पूजा करतात. दरवर्षी आपण त्याच पारंपारिक पद्धतीने 'महाशिवरात्री' साजरी करतो आणि खूप आनंदी होतो. पण या सणाच्या थाटात आपल्याला या उत्सवाचा सूक्ष्म आणि खरा सूर ऐकायला मिळत नाही. भगवान शिव आणि त्याच्याशी संबंधित प्रत्येक पैलूमध्ये एक रहस्यमय घटक, एक मार्मिक प्रेरणा आहे, जी आपल्याला बाह्य जगाशी नाही तर आंतरिक जगाशी जोडते.

महाशिवरात्रीचा सण आपल्यासमोर मूळ प्रश्न घेऊन येतो - देवाधिदेव भगवान शंकर कुठे सापडतील? शिवमंदिरात? पॅगोडामध्ये? अमरनाथवर? काशीत? आमच्या भोळ्या बाबांना शोधायला कुठे जायचे? काय करायचं? हे देखील शक्य आहे का? या प्रश्नाचे उत्तर आपल्याला भगवान शिवाच्या हजार नावांपैकी काही विशेष दैवी नावांमध्ये असलेल्या दैवी चिन्हांवरून मिळते. कोटीरुद्र संहितेच्या अध्याय-३५ मध्ये, सुता स्पष्ट करते की, भगवान शिवाची 'शैवम् नामसहस्र काम'- हजारो नावे आहेत. त्यातील एक म्हणजे 'वेद्यः', म्हणजे जाणता. दुसरे 'विज्ञाने', म्हणजे ज्यांना ओळखता येते. भव निःसंशयपणे जाणणे, म्हणजेच भगवान शिवाची प्राप्ती करणे शक्य आहे. आता त्यांना कसे ओळखता येईल असा प्रश्न पडतो. त्यांना एक नाव आहे: 'ज्ञानगम्य', म्हणजे ज्यांना केवळ 'ज्ञाना' द्वारे ओळखता किंवा अनुभवता येते. शिवपुराणातील रुद्रसंहितेच्या 43 व्या अध्यायात महादेव शंकर स्वतः प्रजापती दक्ष यांना म्हणतात - 'वेद-वदंताचे प्रगत विद्वान




मला ज्ञानाद्वारे ओळखू शकतात. ज्यांच्याकडे कुंठित बुद्धी आहे तेच मला ज्ञानाशिवाय मिळवण्याचा प्रयत्न करतात.' येथे भगवान शिव 'ब्रह्मज्ञान' किंवा 'आत्मज्ञान' यांना 'ज्ञान' म्हणत आहेत. ब्रह्मज्ञान किंवा आत्मज्ञानाची दीक्षा घेतल्यानंतर महादेव साधकासमोर प्रकट होतात. म्हणून, या नावांचा उल्लेख शिव नावांच्या मालिकेतही केला जातो – 'ध्याय', 'ध्यानधार' – जे ध्यानाचा आधार आहेत, म्हणजेच ज्यावर साधक लक्ष केंद्रित करू शकतो; 'समाधिवेद्य' – ज्यांना साधक समाधीच्या अवस्थेत किंवा गहन ध्यानात पाहतो आणि ओळखतो. ब्रह्मज्ञानाद्वारे साधकाच्या हृदयातील करकमळात भगवंताचे परम रूप प्रकट होते. म्हणूनच भगवान शिव यांना या नावांनीही संबोधले गेले- 'हृत्पुण्डरीकमासीनः' म्हणजेच आकाशात रत्नाप्रमाणे फुलणारा (अंतरंग) वास्तविक महादेव शिव सगुण आणि निर्गुण या दोन्ही रूपात वास करतात. म्हणूनच त्याचे एक नाव आहे - 'सकलो निश्चल' म्हणजे शारीरिक आणि निराकार ईश्वर. परंतु भगवंताचे विशेष रूप, ज्यामध्ये तो साधकाच्या अंतरंगात प्रकट होतो, ते आहे - तीव्र प्रकाश आणि प्रकाशाचे रूप. हेच कारण आहे की, शिव सहस्रनाम स्तोत्रातील अनेक नावे त्यांच्या स्वरूपाचे वर्णन करतात - 'तेजोमयः', 'आलोकह', 'हिरण्य' (सुवर्ण किंवा तेजस्वी रूप), 'स्वयंज्योतिस्तानुज्योतिया' (स्वतःच्या प्रकाशाने प्रकाशित होणारे सूक्ष्म प्रकाश स्वरूप). 'आत्मज्योतिह', ब्रह्मज्योतिह', 'महाज्योतिर्नुत्तह' (महाज्योतिहाचे सर्वश्रेष्ठ रूप), 'परम ज्योतिह', 'भराजष्णुह' (एकदम प्रकाशाचे रूप), 'सहस्रार्चिह' (हजारो किरणांनी प्रकाशित) इ. भगवान शंकराचे हे तेजस्वी रूप आतील जगात पाहण्याची एकच पद्धत आहे जी ब्रह्मज्ञानानेच साध्य होऊ शकते. ब्रह्मज्ञानाद्वारे केवळ शिवाचे प्रकाश तत्वच प्रकट होत नाही, तर साधकाचे 'ज्ञानाचे नेत्र'ही त्याला पाहण्यासाठी जागृत होते. तुम्ही 'ज्ञाननेत्र' या नावाने 'शिवनेत्रा', 'तिसरा डोळा', ' 'दिव्यदृष्टी' इत्यादी कोणत्याही नावाने संबोधू शकता. हे भगवान शंकराच्या कपाळावर असलेल्या तिसऱ्या डोळ्याप्रमाणे प्रत्येक साधकाच्या कपाळावर असते, परंतु सूक्ष्म स्वरूपात असते. ब्रह्मज्ञानाने हा डोळा उघडताच भगवान शिव प्रत्यक्षपणे स्वतःमध्येच दिसू शकतात. महादेवाची 'ललताक्ष', 'भालनेत्र', 'त्र्यंबकह' इत्यादी नावंही आपल्याला हाच संदेश देतात.

केवळ तत्वदर्शी सद्गुरूच ब्रह्मज्ञान देऊ शकतात आणि तिसरा डोळा उघडण्याची शक्ती त्यांच्याकडे आहे. जीवनातील अध्यात्मिक गुरूंच्या या महत्त्वामुळे भगवान शिवाचे एक नाव 'गुरुदाह' ठेवण्यात आले. 'गुरुदाह' म्हणजे जो साधकांना गुरू प्राप्त करण्यास मदत करतो, ज्याच्या कृपेने भक्ताच्या जीवनात सद्गुरू प्रकट होतात. म्हणून महाशिवरात्रीच्या या सणाच्या दिवशी आपण 'गुरुदाह' (भगवान शिव) कडे प्रार्थना करतो की, आपल्या जीवनात लवकरात लवकर पूर्ण सतगुरुचा प्रवेश व्हावा, जेणेकरून त्याच्याकडून 'ब्रह्मज्ञान' आणि 'तिसरा डोळा' प्राप्त झाल्यानंतर आपण शिवाच्या प्रकाशाच्या अलौकिक रूपाचा अनुभव करू शकू. ज्ञानदीक्षा घ्या दर्शन घेण्यास सक्षम व्हा.दिव्य ज्योती जागृति संस्थेतर्फे महाशिवरात्रीच्या हार्दिक शुभेच्छा.

**गुरुदेव श्री आशुतोष महाराज जी (संस्थापक एवं संचालक, दिव्य ज्योति जाग्रति संस्थान)**

# सृष्टीचे पालनहार "देवादी देव महादेव"!

भोले शंकर संपूर्ण सृष्टीचे व हिंदू धर्माचे तारणहार दैवत आहे.असे सांगण्यात येते की संपूर्ण ब्रम्हांडामध्ये 33 कोटी देवी-देवतांचा वास आहे. परंतु यात सर्वांचे पालनहार देवादी देव महादेव म्हणजेच "शिव-पार्वती" आहे. त्यामुळे शंकरजीला भोल्या शंकरा म्हटल्या जाते. समुद्र मंथनाच्या वेळेस जे विष निघाले ते शंकरजीनी प्राशन करून संपूर्ण सृष्टीला वाचवीले व विष प्राशन केल्याने त्यांचा कंठ निळा झाला. शंकराचा वास सर्वसाधारण ठिकाणापासून तर स्मशान भूमीपर्यंत दिसून येतो.म्हणजेच आकार-पाताळ-पुर्व-पश्चिम-उत्तर-दक्षिण या संपूर्ण ठिकाणी आपल्याला कोणत्या ना कोणत्या रूपात भगवान शंकरजींचे दर्शन अवश्य होते.त्यामुळेच हिंदुमान्यतेनुसार शंकराच्या मुर्तीची किंवा पिंडाची पुजा केली जाते. भोले शंभर सर्वसामान्यांचेच देवता नसुन मानव-देव-दानव-किन्नर सर्वांचे आराध्य दैवत आहे.त्यामुळे आजही नागव्दार,महादेव,पचमडी इत्यादी अनेक ठिकाणी हजारोंच्या संख्येने भाविक दरवर्षी महादेवाच्या दर्शनाला जातात व भोल्या शंकराचे दर्शन घेऊन आपली मनोकामना पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. रावनासारखा महाग्यानी घोर राजनितीज्ञ हा सुद्धा शंकरजीचा कट्टर भक्त होता. रावणाची भक्ती पाहून त्यांना वर्दानसुध्दा दीले होते.त्यामुळे शंकरजीची पुजा सर्वांनाच करण्याचा अधिकार आहे. कारण शंकरजींची महीमा अपरंपार आहे.याच उद्देशाने शंकरजींनी आपले वास्तव्य सर्वसामान्यांपासून तर स्मशान भुमीपर्यंत अजरामर ठेवले आहे.आज स्थल,जल,वायु, आकाश-पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर- दक्षिण या संपूर्ण ठिकाणी आपल्याला भोले शंकराचे दर्शन होते.आज आपण नद्यांचा उगम पहातो तो उगम शंकरजींच्या जटेतुन झाल्याचे अनेक कथा व पुराणात पहातो. कोणी मानो अथवा न मानो परंतु आपण या पृथ्वीतलावर हसतो,खेळतो,बागडतो यांचे मुख्य कारण म्हणजे या ब्रम्हांडातील देवी-देवतांचा वासच आहे. कोणतीही देवी-देवता असो त्यांचे स्मरण केल्याने मानसाच्या ह्रदयात व मनात एक उत्सहाचे वातावरण निर्माण होते. कोणताही देव दीसत नसला तरी मनात असला पाहिजे व संपूर्ण शक्ती सत्कर्मासाठी समर्पीत केली पाहिजे. आज संपूर्ण निसर्ग जो आपल्याला दिसतो त्यात लाखोंच्या संख्येने अनेक वृक्ष, फुले,फळे दिसून येते ही संपूर्ण ईश्वरी देनच आहे.परंतु संपूर्ण निसर्गाची रक्षा करने मानवजातीचे प्रथम कर्तव्य आहे.आपण सत्कर्माचा मार्ग अवलंबवीला तर देवादी देव महादेव आपणापर्यंत अवश्य येईल. महाशिवरात्री हा हिंदू धर्माचा पवित्र सन आहे. त्यामुळे महाशिवरात्री हा सन मोठ्या भक्तिभावाने सर्वत्र साजरा केल्या जातो. त्यामुळे आपल्याला सर्वत्र उत्सहाचे व मंगलमय वातावरण दिसून येते.महाशिरात्रीला बेलपत्ती,गोंगलाचे फुले याला जास्त महत्व असते. म्हणजे पृथ्वीतलावरील प्रत्येक झाडाला, फळांना किंवा फुलांना आगळेवेगळे महत्व असते हे आपल्याला दिसुन येते.महादेवाचे गुणगान गाण्यांच्या स्वरूपात आपल्याला ऐकायला व पहायला मिळते. संपुर्ण भारतात 12 ज्योतिर्लिंग आहेत त्यापैकी 5 महाराष्ट्रात आहे. त्र्यंबकेश्वर, परळी बैजनाथ, भिमाशंकर, औंढा नागनाथ, घृष्णेश्वर ही बाब महाराष्ट्राच्या दृष्टीने गौरवशाली बाब आहे.या व्यतीरीक्त महाराष्ट्रासह भारतात भगवान शंकरजीचे अनेक मंदिरे आहेत.यावरून स्पष्ट होते की भगवान शंकरजीवर सर्वांचीच आस्था आहे.त्याच प्रमाणे ॐ नमो: शिवाय ,ॐ शांती,हर हर महादेव इत्यादींचा जप केल्याने मन प्रसन्न रहाते व शांती मिळते व अनेक आजार दुर होण्यास मोठी मदत मिळते. आपण भोले शंकराचा जयघोष शिवकालीन इतिहासामध्ये सुध्दा ऐकली व पहाली आहे.शिवाजी महाराज व मावळे लढाईवर जातांना "हर हर महादेव"चा जयघोष करीत असे. यामुळे सैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण होवून एक नवीन उर्जा निर्माण होत होती.त्याचप्रमाणे आजही आपल्याला प्रत्येक शंकरजींच्या मंदिरात भाविकांचा "हर हर महादेव "चा जयघोष ऐकायला मिळतो.यामुळे सर्वांचेच मन प्रसन्न होते व नवीन ऊर्जा निर्माण होते.याचे मुख्य कारण म्हणजे देवादी देव महादेव हे सर्वांचेच पालनहार दैवत आहे.महाशिवरात्रीच्या सणाला भावीक मोठ्या उत्साहाने उपवास ठेवतात यामागचा एकच उद्देश असतो की हे देवादी देव महादेव येणारे विघ्न टळुदे व सुख-शांती प्रदान कर. कारण आपण सुखी तर देश सुखी, देश सुखी तर संपूर्ण सृष्टी सुखी. महाशिवरात्रीच्या निमित्ताने मी हेच सांगु इच्छितो की स्थल,जल,वायु व निसर्ग याची जोपासना मानवजातीने वेळोवेळी केलीच पाहिजे.आज वाढते प्रदुषण, जंगलातील हिंसक पशु शहरात प्रवेश करने, जंगलाला वनवे लागने,हिमकडा कोसळुन महाप्रलय येने,भुकंप याला रोखण्यासाठी संपूर्ण मानवजातीने निसर्गाची जोपासना केलीच पाहिजे.अन्यथा देवादी देव महादेव विक्राळ रूप सुध्दा धारण करू शकते.याला नाकारता येत नाही.याचे अनेक उदाहरणे आपल्या समोर आहे.आपण निसर्गाची निर्मळ मनाने सेवा व जोपासना केली तर देवांदी देव महादेव अवश्य प्रसन्न होतील.यात दुमत नाही.देशात महाप्रलय,भुकंप,अती उष्णता,अती थंडी, सुनामी,वनवा लागणे, प्रदुषणात वाढ होणे या संपूर्ण गोष्टी निसर्गावर होत असलेल्या अन्यायामुळे दिसून येते.देवादी देव महादेवाचा वास दऱ्या-खोऱ्यात,पहाडात, जंगलात, निसर्गानच्या काणा-कोटऱ्यात व कणाकणात आपल्याला पहायला मिळतो.त्यामुळे महाशिवरात्रीच्या सनाच्या निमित्ताने निसर्गाची जोपासना करण्यासाठी सर्वांनीच संकल्प केला पाहिजे व निसर्ग संपदा विनाशापासुन वाचविली पाहिजे.महाशिवरात्रीच्या निमित्ताने प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.कारण प्रत्येक वृक्षाच्या पानात, फुलात, फळात आपल्याला भोले शंकराचे दर्शन अवश्य होईल. त्याचबरोबर वृक्ष लागवडीमुळे गुरांना चारा, मानवाला शुद्ध हवा व सर्वांनाच शुद्ध ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. महाशिवरात्रिच्या निमित्ताने जर वृक्षलागवड झाली तर देशात एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड सहज होईल व निसर्ग प्रफुल्लित होण्यास मोठी मदत मिळेल.हर हर महादेव!



**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार (माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमाचे मूल्यांकन करणाऱ्या माजलगावच्या तालुका पथकाची चौकशी करा - प्रशांत बोराडे

## येत्या आठ दिवसात चौकशी करून दोषीवर कारवाई नाही केली आंदोलन करण्याचा इशारा



**वादळवार्ता/माजलगाव**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हा उपक्रम संपूर्ण राज्यभर चालू आहे. या माध्यमातून शाळेची गुणवत्ता व शाळेत असणाऱ्या सुविधा यांची तपासणी करून मूल्यांकन केल्या जाते.व या मधे प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांक काढून त्यांना विशिष्ट रक्कम देखील बक्षीस म्हणून दिल्या जाते व त्या शाळेचा बहुमान केल्या जातो. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या योजनेअंतर्गत गणेश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय हिवरा बुद्रुक तालुका माजलगाव या शाळेचे मूल्यांकन केंद्रीय पथकाने केले असता १०० पैकी ९७ गुण प्राप्त झाले होते. त्या ९७ गुण मिळवणाऱ्या गणेश विद्यालयाचे मूल्यांकन माजलगाव तालुक्याच्या पथकाने व्यवस्थित केले नसल्याचा आरोप संबंधित महाविद्यालयाचे मुख्याध्यापक श्री सोनवणे सर यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केलेला आहे. माजलगाव तालुक्याचे मूल्यांकन पथक माजलगाव तालुक्यातील शाळांचे मूल्यांकन करत शाळेचे परिक्षण करत होते. असेच शाळा तपासणी करत असताना माजलगाव तालुक्याचे पथक गणेश विद्यालय हिवरा या ठिकाणी गेले व संबंधित विद्यालयाचे मूल्यांकन न करता भूक लागल्याचे कारण सांगून त्या विद्यालयाचे मुख्याध्यापक असणाऱ्या श्री सोनवणे सर यांच्या कोऱ्या पेपरवर स्वाक्षरी घेऊन पथकाने आपल्या पदाचा गैरफायदा घेतल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सम्यक विद्यार्थी आंदोलनाला माजलगाव तालुक्याच्या पथकाने केलेल्या मूल्यांकनावरती संशय आहे. गणेश महाविद्यालयाने तालुका पथकाची तक्रार देखील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केलेली आहे. मात्र वरिष्ठानकडून माजलगावच्या तालुका पथकाचे अजून काही चौकशी झाल्याचे निदर्शनास येत नाही.त्यामुळे, भूक लागल्याचे कारण दाखवून शाळेचे मूल्यांकन न करता गौडबंगाल करणाऱ्या माजलगाव तालुक्याच्या मूल्यांकन पथकाची रीतसर चौकशी करून तात्काळ दोषीवर कायदेशीर कारवाई करावी अशा पद्धतीची मागणी आज आम्ही सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या वतीने बीड जिल्हा शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक दोन्हींनाही भेटून तक्रार केली.येत्या आठ दिवसात चौकशी करून दोषीवर कारवाई नाही केली तर सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या वतीने शिक्षण उपसंचालक छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.यावेळी सम्यकचे राज्य प्रवक्ते प्रशांत बोराडे, वंचितचे युवा जिल्हाध्यक्ष अनुरथ वीर,सम्यकचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर,प्रमोद निकाळजे,अजय गायकवाड, रोहन लांडगे जय भीम वाघमारे योगेश पोटफोडे विनोद पोटफोडे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

# बसंत पंचमी उत्सव मंडळ ट्रस्ट तर्फे महिलांच्या समस्या सुटाव्यात यासाठी पोलीस प्रशासन व तहसील प्रशासनाला देण्यात आले निवेदन.

## निवेदनाद्वारे समस्या सोडविण्याची केली मागणी.



दैनिक वादळ वार्ता
उरण/विठ्ठल ममताबादे

उरण शहरात तसेच उरण तालुक्यात अनेक ठिकाणी स्वच्छतागृहांची(प्रसाधनगृहांची )योग्य ती सोय नाही. अनेक महत्वाच्या ठिकाणी स्वच्छता गृहे नाहीत. तसेच ज्या ठिकाणी स्वच्छता गृहे आहेत त्या ठिकाणी योग्य ती साफसफाई नाही. योग्य नियोजन नाही. या महत्वाच्या समस्येकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी विशेषत : महिलांच्या दृष्टीने महत्वाची असलेली ही समस्या सोडविण्यात यावी. प्रशासनाने यात लक्ष घालून ही समस्या त्वरित सोडवावी यासाठी बसंत पंचमी उत्सव मंडळ (रजि.)ट्रस्ट तर्फे उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम तसेच उरणचे तहसीलदार उद्धव कदम यांना निवेदन देण्यात आले. यावेळी बसंत पंचमी उत्सव मंडळ (रजि.) ट्रस्टचे सचिव सपना सिंह, सदस्य - रेखा यादव, बबिता शर्मा, नीलम सिंग, नितु सिंह, बिनिता यादव, मंजू साह आदी महिला पदाधिकारी सदस्या मोठया प्रमाणात उपस्थित होते. या निवेदनावर प्रतिक्रिया देताना तहसीलदार उद्धव कदम म्हणाले की याबाबत वरिष्ठ अधिकारांना कळवितो.तसेच नगर परिषद अंतर्गत या समस्या येत असल्यामुळे तिथेही आपल्या समस्या कळवितो. समस्या सोडविण्यासाठी नक्कीच प्रयत्न करू.तर उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम यांनी सकारात्मक भूमिका घेत उरण पोलीस स्टेशन परिसरात महिला भगिनींसाठी सुसज्ज असे स्वच्छता गृह(प्रसाधनगृह )बांधण्याचे प्रस्तावित असल्याचे सांगितले.याबाबत आपण उरण नगर परिषदेला सुद्धा कळविणार आहे. जे काही मदत करता येईल ते करू असे सतीश निकम यांनी सांगितले. महिलांना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी बसंत पंचमी उत्सव मंडळ ट्रस्टतर्फे निवेदन देण्यात आले असून जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाहीत तोपर्यंत या गोष्टीचा सतत पाठपुरावा करण्यात येईल असे सचिव सपना सिंह यांनी सांगितले. बसंत पंचमी उत्सव मंडळ ट्रस्ट तर्फे करण्यात आलेल्या मागण्या खालीलप्रमाणे

१) उरण शहरात (मार्केट भागात व इतर ठिकाणी) महिलांसाठी प्रसाधनगृह नाही ते बनविण्यात यावे व त्याची साफ- सफाई नियमित करण्यात यावी.

२) पिरवाडी, समुद्राजवळ महिलांसाठी शौचालय/प्रसाधनगृहाचीव्यवस्थाकरावी.

३) ज्या महिला कामगार आहेत किंवा मोलकरीण, मोलमजुरी करीत आहेत. अशा महिलांना सामाजिक सुरक्षेसंदर्भात सरकारी विमा योजना मोहिम चालवावी.


४) इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयमध्ये ICU व NICU ची सुविधा करावी.

५) सरकारी विद्यालयात शौचालय/ प्रसाधन गृहाची व्यवस्था करावी.

६) उरण पोलीस स्टेशन तसेच मोरा सागरी विभाग पोलीस स्टेशन मध्ये महिलां पोलिसांसाठी प्रसाधनगृहाची व्यवस्था करावी.

# सोनारी येथील रामचंद्र कडू यांच्या घराला उच्च न्यायालया कडून दिलासा

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**



सोनारी ग्रामपंचायत हद्दीतील घरांचा विषय ऐरणीवर आला असताना, सोनारी ग्रामपंचायत हद्दीतील रहिवाशी रामचंद्र पोशा कडू यांच्या घरा संदर्भात मुंबई उच्च न्यायालयात त्यांचे वकील अँड प्रियांका सुरेश ठाकूर यांचे मार्फत सिव्हिल रिट पिटीशन क्रं २६६१/२०२४ दाखल करण्यात आले असता मा. उच्च न्यायालयाने कोकण कमिशनर रायगड जिल्हाधिकारी यास उरण तालुक्यातील सोनारी ग्रामपंचायत हद्दीतील रामचंद्र पोशा कडू यांच्या घर क्रं २८०/अ /ब या घरावर तोडक कारवाई करण्यास मनाई केली आहे.एकंदरीत कडू यांना मा.उच्च न्यायालयाकडून दिलासा मिळाला आहे.

या प्रकरणी थोडक्यात हकिकत अशी की जेएनपीएने २२ वर्षांपूर्वी सार्वजनिक उपयोगासाठी सुमारे ३३ हेक्टर क्षेत्र प्रकल्पबाधित सोनारी,करळ , सावरखार, जसखार आदी चार गावांसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपुर्द केले आहे .त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी सदर जमिनी चारही ग्रामपंचायतींच्या नावे केल्या आहेत.मात्र ग्रामपंचायतीच्या मालकीच्या जमिनी स्थानिक ग्रामस्थ मंडळाने फरोक्त खताने गावकऱ्यांना विकल्या आहेत. या जमिनीवर नागरिकांनी घरे बांधली आहेत. अशाच बांधलेल्या घरांवरुन सोनारी येथील रहिवासी उर्मिला आशिर्वाद म्हात्रे आणि रामचंद्र पोशा कडू यांच्यात वाद निर्माण झाला होता.उर्मिला म्हात्रे यांनी मा.उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्रं ९३२३/२०२२ दाखल केली होती. उच्च न्यायालयाने या प्रकरणी चौकशी करून कारवाई करण्याच्या सूचना रायगड जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या होत्या.त्यानंतर या प्रकरणी सुनावणी घेऊन दोषींवर कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी पनवेल प्रांत अधिकाऱ्यांना दिले होते.पनवेल प्रांत. अधिकाऱ्यांनी सदर प्रकरणी सुनावणी घेऊन अर्जदार सौ.उर्मिला म्हात्रे यांनी ज्यांच्या विरोधात तक्रार केली होती ते रामचंद्र कडू या दोघांची ही बांधकामे बेकायदेशीर आहेत.त्यामुळे ती बांधकामे एक महिन्याच्या आत तोडावीत असे आदेश गटविकास अधिकारी उरण पंचायत समिती यांस दिले.तसेच अधिकार नसताना जागेची विक्री केली म्हणून सोनारी ग्रामसुधारणा कार्यकारी मंडळातील सदस्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले.त्यामुळे एकच परिसरात खळबळ माजली.

या संदर्भात रामचंद्र पोशा कडू यांनी कोकण कमिशनर व रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अपिल दाखल करण्यास गेले असता कडू यांचे सदर प्रकरणी अपिल दोन्ही कार्यालयानी करुन घेतले नाही.त्यामुळे रामचंद्र पोशा कडू यांनी त्यांचे वकील अँड प्रियांका सुरेश ठाकूर यांच्या मार्फत मा.उच्च न्यायालय मुंबई यांचेकडे रिट पिटीशन दाखल केली.यावर मुंबई उच्च न्यायालयाच्या डिव्हीजन बेंचने कडू यांची रिट याचिका मान्य केली. सदर रिट याचिकेवर उच्च न्यायालयाचे डिव्हिजनल बेंच पुढे सुनावणीस आली असता मा.न्यायमुर्ती श्री जी एस कुलकर्णी व मा.न्यायमुर्ती श्री.फिरदोश पुनीवाल्ला यांच्या डिविजनल बेंचने तोडक कारवाईस मनाई करण्याचा आदेश देऊन अर्जदार रामचंद्र पोशा कडू,रोशन कडू यांस कोकण कमिशनर यांच्याकडे दोन आठवड्यात अर्ज दाखल करावा व कोकण कमिशनरने त्यावर सुनावणी घ्यावी असे आदेश दिले आहेत.याप्रकरणी अर्जदारांची बाजू अँड प्रियांका सुरेश ठाकूर यांनी प्रभावीपणे मांडली.

एकंदरीत उरण तालुक्यातील सोनारी प्रमाणे गावातील ग्रामसुधारण मंडळांनी जसखार, करळ ,सावरखार गावातील ग्रामस्थांना जमिनीचे वाटप केले असून सदर जागेवर ग्रामस्थांनी अनेक घरे बांधली आहेत.त्या बांधकामांचे काय होणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# "मराठीचा समृद्ध वसा वारसा जपून समृद्ध केला पाहिजे " - शामला पंडित

**दैनिक वादळ वार्ता**

प्रतिभा शिक्षणशास्त्र महाविद्यालय चिंचवड येथे " मराठी भाषा गौरव दिन " साजरा . प्रतिभा शिक्षणशास्त्र महाविद्यालय चिंचवड आयोजित मराठी दिनाच्या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी कवयित्री , लेखिका मा. शामला पंडित ( दीक्षित ) मॅडम, अध्यक्ष कॉलेजच्या प्राचार्या डॉ. पौर्णिमा कदम मॅडम,मराठी भाषा विभाग प्रमुख प्रा. गीता कांबळे मॅडम व्यासपीठावर उपस्थित होत्या. सरस्वती पूजन आणि विद्यापीठ गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रा. गीता कांबळे मॅडम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.



प्रमुख पाहुण्यांचा सत्कार प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आला. बी.एड प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनींनी "जागर मराठी भाषेचा" हे मराठी भाषेचा गौरव सांगणारे नाटक सादर केले. त्यात प्रत्येक प्रांतातील प्रतिनिधीने तिथल्या बोलीभाषेत बोलत नाटक संवाद स्वरूपात रंगवले. सहभागी विद्यार्थिनी- तृशांती तांबे, धनश्री परांजपे, हर्षा सपके,सायली देशपांडे, मनीषा मोठे, स्वाती शेलार,अश्विनी वाघमारे, शिल्पा,विद्या,सायली बामनोळकर,मृणाल प्रमुख अतिथींचे कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी कवयित्री लेखिका शामला पंडित (दीक्षित ) यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले .

# साहित्यरत्न आण्णा भाऊ साठे वस्ती सुधार योजना अंतर्गत निधी खर्च न केल्याने शुभम धनवे यांचे जिल्हाधिकारी निवेदन

**वादळवार्ता/बीड**

लोकशाहीर आण्णा भाऊ साठे सुधार योजना प्रभाग क्र ४ मध्ये एकुण निधी सन २०२२/२३ वस्ती सुधारण्यासाठी २,२०,२१,५०० निधी प्राप्त झाला शिशी रस्ता,नाली बांधकाम,व विविध योजनेसाठी निधी प्राप्त झाला होता परंतु अद्याप पर्यत हा निधी खर्च केला नाही,या योजनेअंतर्गत पुरग्रस्त कॉलनी येथे शिशी रस्ता ,नाली बांधकाम,शौचालययासाठी ११२१३०० रूपये दि.२९-१२-२०२२ रोजी प्रशासकीय मान्यता देऊन व कार्यरंभ आदेश काढुन दीड वर्ष पुर्ण होत आसताना देखील आज काम झालेले नाही ज्यावेळी आम्ही सदरील ठिकाणी पाहणी केली आसता कोणत्याही प्रकारचे काम न झालेले निर्देशास आले आहे स्थानिक नागरिकांशी विचारपुस केली आसता प्रशासनीतील अधिकारी व कन्ट्रक्शन मालक पाहणी करण्यासाठी दीड वर्षात एकदाही आलेले नाहीत व काम न करता बिले उचण्याची शक्यता नाकारता येत नाही महाराष्ट्र शासनाच्या दलीत वस्तु सुधार योजनेसाठी विषेश बाब आणतात परंतु भ्रष्ट ठेकेदार हा निधी म्हणुन राखीव प्रभागाला निधी दिला जातो कारण की दलीत वस्तातील या योजनेतुन दलीत समाजाच्या भागातील विकास होण्यासाठी शासन विविध योजना अमंलात



प्रशासनातील अधिकार्यांना सगनमंत करून हा निधी काम न करता जातीये भावनेतुन मागासवर्गीयच्या वस्त्या जाणीवपूर्वक विकास न करण्याचा विढा उचला आहे का आशा संशय गोरगरीब जनतेतुन व्यक्त होत आहे सदरील कामाचे अंदाजपत्रक देण्यात यावे व सदरील कन्ट्रक्शन ला काळ्या यादीत टाकुन शासनाची खुप मोठी फसवणूक केल्यामुळे गुन्हा नोंद करण्यासाठी नगर परिषद बीड मुख्याधिकारी यांनी पाठपुरावा करावा नसता मी आपल्या विरूध लोकशाही मार्गाने आपल्या जबाबदार धरून विभागिय कार्यालयवर आंदोलन करण्यात येईल या निदेनदातुन इशारा देत आहे.

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक
# वादळ वार्ता




पुणे: दि.५ मार्च २०२४ - पुण्यात नुकतीच पहिली वर्ल्ड क्वीन बीज परिषद संपन्न झाली.अध्यक्षस्थानी विश्वजोडो अभियानाचे संस्थापक अध्यक्ष तसेच वर्ल्ड क्वीन बीज संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मधुसूदन घाणेकर होते.भारतीय जनता पार्टी, ज्येष्ठ नागरिक आघाडीच्या शहर महिला सहकार्याध्यक्ष भारती महाडिक यांच्या शुभहस्ते परिषदेचे उदघाटन करण्यात आले

# राज्य सरकार ने १०% SEBC आरक्षण कोणत्या कायद्यानुसार दिले - सकल मराठा समाज मुंबई चा सवाल.

## एससीबीसी - २४ हा जुनाच कायदा पास करून मराठ्यांना १०% आरक्षण देऊ केले आहे.

**दैनिक वादळ वार्ता**

मुंबई : गेले ६ - ७ महिन्यापासून महाराष्ट्रात सुरू असलेले मराठा आरक्षणासाठी आंदोलन चिरडण्यासाठी राज्य सरकारने कसे फसवे आरक्षण देऊन पुन्हा एकदा मराठा समाजाच्या तोंडाला पाने पुसली आहेत याचा प्रत्यय संपूर्ण मराठा समाजाला आला आहे. स्वतःला अधिकार नसतांना राज्यसरकारने नव्याने एससीबीसी - २४ हा जुनाच कायदा पास करून मराठ्यांना १०% आरक्षण देऊ केले आहे. परंतु हा कायदा टिकणारच नाही याबद्दल विधीज्ञ, जाणकार आणि सर्वसामान्य मराठा बांधवात एकमत असून आपली सार्वत्रिक फसवणूक केली आहे. अशी राज्यभर मराठा समाजाची भावना असून त्याच्या वेगवेगळ्या मार्गाने अतिशय गंभीर प्रतिक्रिया समाजात उमटत आहेत. आणि हे आरक्षण आम्ही नाकारत आहोत असे सकल मराठा समाज अतिशय धाडसाने आणि जबाबदारीने जाहीर बोलत आहे. आणि याचे अतिशय दुरगामी परिणाम महाराष्ट्राच्या समाजजीवनात आणि विशेषतः तरुण मराठा समाज बांधवात उमटत आहेत. खर तर तांत्रिक अडचणी लक्षात घेता मराठा समाजाला जरी वेगळं आरक्षण द्यायचे झाले तरी ते राज्याच्या अख्यातिरीत येत नाही. कोणता ही कायदा संसदेमध्ये बनतो अस असताना मराठा समाजाची ३ वेळा फसवणूक राज्य सरकारने केली आहे. त्यामुळे राज्य सरकारने आता केंद्र सरकार ला प्रस्ताव पाठवून आचारसंहितेच्या अगोदर संसदेमध्ये ऑर्डीनस बनवावा. तरच मराठ्यांना टिकणारे आरक्षण मिळेल. ज्यांच्या कुणबी नोंदी मिळत आहेत त्यांना आज पर्यंत एका ही कुणबी दाखल्याला वैलिडीटी मिळाली नाही हे ही तितकंच खर आहे. एकीकडे कुणबी नोंदी मिळत असताना ज्या मराठ्यांच्या नोंदी मिळत नाहीत त्यांना आरक्षण कसे मिळू शकते ? हा प्रश्न देखील या निमित्ताने उभा राहिला आहे. मराठा समाजासोबत देशभरातील कृषक



समजला जाणारा पटेल, जाट, गुज्जर, कापू अशा समाजाला देखील आरक्षण मिळू शकते व मराठा आरक्षणाचा प्रश्न देखील सुटू शकतो. त्यामुळे आता केंद्र सरकारने यामधे लक्ष देणं तितकच महत्वाचे आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिष्टमंडळ भेट घेऊन यावर सविस्तर चर्चा करून केंद्राला विनंती करणार आहे. नाही तर मराठा, पटेल, जाट, गुज्जर, कापू अशा समाजाला एकत्र घेऊन हा लढा अधिक तीव्र करणार आहोत. असे ब्रिगेडियर सुधीर सावंत व संजय लाखे पाटील, अमोल (भैय्या) जाधवराव यांनी आजच्या पत्रकार परिषद मधे सांगितले. यावेळी मुंबई मधील सकल मराठा समाज उपस्थित होता.

# जमावबंदी आदेश उल्लंघन प्रकरणी मनोज जरांगे पाटील, राहुल टेकाळे याच्यासह इतरांवर गुन्हा दाखल.

**वादळवार्ता/बीड**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी लढा उभारणारे मनोज जरांगे पाटील यांनी आता संवाद दौरा सुरू केला आहे. या दौऱ्यादरम्यान त्यांचा उमरद खा फाटा येथे स्वागताचा कार्यक्रम घेण्यात आला होता. यावेळी रस्तांच्या दोन्ही बाजुंनी जेसीबी उभे करुन त्यामधुन त्यांच्यावर फुलांचा बर्षाव करण्यात आला. सदरील कार्यक्रमामुळे जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केल्या प्रकरणी पेठ बीड पोलीस स्टेशन येथे मनोज जरांगे पाटील यांच्यासह ईतरांवर तर राहुल टेकाळे यांच्यासह इतरांवर पिंपळनेर पोलिस ठाण्यात गुन्हे



दाखल झाले आहेत. पोलीसांनी जेसीबीचा असुरक्षित वापर केल्याचे नमुद केले आहे. मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील हे दि.5 मार्च 2024 रोजी बीड येथे आले होते. बीड-पिंपळनेर रोड येथील उमरद खा फाटा येथे त्यांच्या स्वागताचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने गर्दी जमली होती. सदरील कार्यक्रमामुळे जमावबंदी आदेशाचे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट करत पोलीसांनी गुन्हे दाखल केले आहेत. यामध्ये पोलीस कर्मचारी यांच्या फिर्यादीवरून आयोजक राहुल टेकाळे, सुभाष गिराम, युवराज लांडे, सचिन शिंदे व इतर पंधरा ते विस जणांवर कलम 188, 135, बीपी Act तसेच 37 (3) (1) चे उल्लंघन केल्या प्रकरणी पिंपळनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. त्याच बरोबर पेठ भागातील नाळवंडी नाका येथे स्वागताचा कार्यक्रम घेण्यात आला होता त्याप्रमाणातही 100 ते 150 जनांवर गुन्हे दाखल करण्यात करण्यात आले. या आधीही मा.जरांगे पाटील यांच्यावर चार ठिकाणी जिल्हाभरात गुन्हे दाखल करण्यात केले असुन पोलीस प्रशासन तांत्रिक मुद्दे उपस्थित करून गुन्हे दाखल करत आहे.

# वतिनं बहुचर्चित हेलपाटा कादंबरीचा सन्मान .....!




**वादळवार्ता**

- तानाजी धरणे लिखित हेलपाटा या कादंबरीला अल्पावधितच ७ राज्यस्तरिय उत्कृष्ट कादंबरीचे पुरस्कार लाभल्याने सर्वत्र हेलपाटा कादंबरीचे जनमाणसात कौतुक होत असुन कादंबरीचा खप वाढला आहे . हेलपाटा कादंबरी अतिशय प्रतिकुल परिस्थित जीवन जगाला शिकवते तसेच कितीही संकटे आली तरी शिक्षण सोडायचे नाही . शिक्षण आणि जिद्द हेच विद्यार्थ्यांच्या यशाचे गमक आहे . गरिबी ही कधीच बसुन न राहणारी गोष्ट असुन त्यावर आपल्याला अथक परिश्रम , चिकाटी , ध्येय याचे जोरावर मात करता येते अशी शिकवण देणारी असल्यानं हेलपाटा हि वाचकाला आपली कहाणी वाटते व वाचक कधी कादंबरीच्या प्रेमात पडतो हे समजत नाही . वाचकाला सतत गुंतवून ठेवणारी व क्षणाक्षणाला उत्कंठा वाढवणारी अशा या कादंबरीचे राज्यभरातुन चाहत्यांकडून होणारे स्वागत व जनमाणसातील हेलपाटा चं असणारं प्रेम व अटुन नातं याचे औचित्य साधुन अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद महाड तालुका अध्यक्ष श्री. सुरेश मेहता सर यांचे पुढाकाराने सचिव सौ.रिचा गांधी मॅडम, सहसचिव सौ. संगिता कांबळे मॅडम, सहखजिनदार सौ. निलांबरी घोलप मॅडम यांनी हेलपाटाकार लेखक / कवी श्री .तानाजी धरणे यांचे महाड येथिल घरी जाऊन एकुणचं हेलपाटा च्या लिखाणाबद्दल व तिला मिळालेल्या राज्यस्तरिय पुरस्काराबद्द यथोचित असा सन्मान, सत्कार केला . या समयी हेलपाटा कादंबरी लिखानाच्या साक्षिदार असलेल्या श्री . तानाजी धरणे यांच्या पत्नी सौ. पुष्पा धरणे यांच्याशी संवाद साधला . या समयी साहित्यिक व एकुणचं हेलपाटा कादंबरीचे लिखाण व तिच्या पुढील वाटचालीबाबत सांगोपांग चर्चा झाली . हेलपाटा कादंबरीला राज्यभर अनेक पुरस्कार मिळाले , मिळत आहेत

# ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्थाच्याही विविध जिल्हा अध्यक्षांच्या निवडी .

मराठी भाषा संवर्धनासाठी पुर्ण महाराष्ट्रभर कार्य करीत आहे. या संस्थेत मुस्लिम मराठी साहित्यिक बंधू व भगिनी व सर्व धर्म मराठी साहित्यिकांना सोबत घेऊन कार्य करणारी संस्था नांवा रूपाला आले आहे .मराठी भाषिकांना वेगवेगळ्या स्वरूपाने म्हणजेच कविता ,गझल , अभंग, हायकू, लावणी , पोवाडा , गीत , भक्ती गीत महापुरुषांचे वैचारिक लेख कथा, कांदब-यां इत्यादी विविध विषयांवर मराठी भाषेतून विस्तारित स्वरूपात मराठी साहित्य निर्माण करून मराठी भाषिकांना उपलब्ध करून देत आहे. संस्थे संस्थापक कवी.शफी बोल्डेकर, अध्यक्ष ॲाड. जेष्ठकवी हाशम पटेल , जेष्ठ साहित्यिकाअनिसा सिकंदर शेख कविवर्य खाजाभाई बागवान व सर्व महाराष्टाची जिल्हा कार्यकारिणी आणि सर्व पदाधिकारी व सदस्यांचा फार मोठा मोलाचा वाटा आहे.यात शंकाच नाही ही सर्व करूनही अजून युंगस्त्री , मुस्लिम अद्य शिक्षिका फातिमाबी शेख यांच्या नावाने राष्ट्रीय एकदिवसीय मराठी साहित्य संमेलन





घेणारी ही महाराष्ट्रातील एकमेव असीही संस्था आहे या संस्थेच्या पुणे जिल्हा अध्यक्षपदी बा .ह .मगदूम . शबाना मुल्ला मुंबई सौ सुरेय्या जहागिरदार सोलापूर मुबरक उमराणी सांगली शमशोदीन मुल्ला सतारा तहेसीन सय्यद लातूर नसीम जमादार कोल्हापूर यांच्या निवडी करण्यात आल्या आहेत .

# बनावट व्यापारी बनून आडत्या कडून ३२लाखाचा चणा,तूर केले लंपास

माजलगाव :शहरातील नवा मोंढा फुले पिंपळगाव येथील शिवम ट्रेंडिंग चा व्यवहार पाहणारे विष्णू भिकुलाल भुतडा वय ४0 वर्षे . पात्रुड ता. माजलगांव यांना विश्वासात घेऊन व्यापारी व दलाल असल्याचे भासवून दोन भामट्यानी 12 टन चणा व 25 टन तूर असा एकूण 32लाख रु चा माल लंपास केल्याची घटना 28 फेब्रुवारी रोजी घडली. या प्रकरणी शहर पोलिसात 6मार्च रोजी गुन्हा दाखल झाला असून या कामी या तोतया ना मदत करणारा ट्रक, ट्रक ड्राइव्हर व मालक लातूर पोलिसाच्या साहाय्याने माजलगाव पोलिसांनी आज दुपारी ताब्यात घेतल्याची माहिती मिळाली आहे.

दि.२८/०२/२०२४ रोजी स.१०.३० वाजण्याच्या सुमारास विष्णू भूतडा आडत दुकानात असतांना योगेश हांडे पाटील या नावाचा इसम आला व त्याने सांगीतले की तुम्हाला काल संध्याकाळी दलाल बालाजी कोयल (गोपाल कॅन्हासिंग) यांनी सांगितल्या प्रमाणे मी माहेश्वरी पलसेस कडून माल खरेदीसाठी आल्याचे सांगितले योगेश हांडे याने चना व तुर पास केला व चना माल १२१ क्विंटल ५० किलो, किंमती ७ लाख ४२ हजार २०० रूपयांचा व तुर माल २५ टन किमती २५ लाख ३७ हजार ५६५ रूपये असे या मालाची माहेश्वरी पल्सेस, एम.आय.डी.सी लातुर या नावाने बील फाडण्यास सांगितले. असे बील फाडून विष्णू भूतडा यांनी माजलगाव MH43 E 2952, ट्रकमध्ये 121 क्विंटल ५० किलो किमती ७ लाख ४२ हजार २०० रूपयांचा चना माल रवाना केला त्याच्या सोबत बिल क्र.६२९ आणि काटा पावती दिली. व दि.२९/०२/२०२४ रोजी सकाळी १० ते १२ वाजन्याच्या दरम्यान व्यंकटेश वे ब्रीज वर वजन काटा करून माहेश्वरी पल्सेसला न देता एम.आय.डी.सी लातुर रस्त्यावर ताड पत्रि वर खाली झाला. असे चालकाने सांगीतले तसेच दि.२९/०२/२०२४ रोजी तुर माल २५१ क्विंटल ३० किलो किमती २५ लाख ३७ हजार ५६५ रूपये हा माल एम.एच.४४ ८८१६ चे बुलढाणा वेअर हाऊस व आडत दुकान येथुन माल भरून पाठवला सदरील मालाचे बील ठरल्याप्रमाणे माहेश्वरी पल्सेस या नावानेच बनविण्यास बालाजी कोयल यांनी सांगीतल्याने बील क्र.६३१ व काटा पावती दिली. दि.०१/०३/२०२४ रोजी सकाळी ०८.३० ते १२.३० च्या दरम्यान लातुर एम आय डि सी मध्ये माहेश्वरी पलसेस ला माल नं देता एम.एच.४० सीएम




F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.
R.O.A.C.
14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
15 Date and time of dispatch to the court
06/3/2024
Signature of Officer in charge, Police Station
Name: Ketan kashinath Rat
Rank: I (Inspector)
पोलीस ठाणे अंमलदार

४५९० या गाडीमध्ये तुर मालाची क्रॉसिंग करण्यात आली. क्रॉसिंग करत असतांना भूतडा यांना कालिक शेख रज्जाक शेख या चालकाचा फोन आला सदरचा माल हा क्रॉसिंग होत आहे. असे कळवल्याने भूतडा यांनी बालाजी कोयल व योगेश हांडे यांना विचारले असता त्यांनी सांगितले की आम्हाला माला चाळणी करायचा आहे, असे सांगून माल हा एम.एच.४० सीएम ४५९० या गाडीमध्ये क्रॉसिंग केला. भूतडा यांनी बालाजी कोयल (गोपाल कॅन्हासिंग) आणि योगेश हांडे यांना माहेश्वरी पल्सेस ची पोच मागीतली असता दोन्ही ही बीलाला पोच देण्यास टाळा टाळ केली व सदरचा माल हा माहेश्वरी पल्सेस येथे खाली न करता एम.आय.डी.सी लातुर येथेच खाली करून मालाची परस्पर विल्हेवाट लावली व भूतडा यांची फसवणुक केली प्रकरणी बालाजी कोयल (गोपाल केंन्हासिंग) आणि योगेश हांडे व एम.एच.४० सीएम ४५९० चे ट्रक चालक यांच्या विरुद्ध कलम 420,406,34 नुसार अपहार, फसवणूक ची गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पी आय केतन राठोड यांच्या मार्गदर्शन खाली पी एस आय दिंडे तपास करत आहे. आज माजलगाव पोलिसांनी लातूर येथे जाऊन ट्रक चालक मालक व ट्रक ताब्यात घेतला आहे.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरुन बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )